दुरध्वनी २४९३४२१४ फॅक्स २४९३६८८१
अधिष्ठाता यांचे कार्यालय
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु)
डॉ.ॲनी बेझंट रोड
वरळी, मुंबई – ४०० ०१८
दिनांक :

**कंत्राटी पध्दतीने अध्यापकांची पदे भरण्यासाठी जाहिरात**

संदर्भ : शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्र.एमईएस-१५०८/प्र.क्र.९४/०८/वैसेवा-१, दि.७.९.२०११

रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई येथील विविध विषयांच्या प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदांवर ३६४ दिवसांचे कालावधीसाठी करार पध्दतीवर तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक करण्यांसाठी मुलाखत (Walk-in-interview) आयोजित करण्यांत येत आहेत. तात्पुरत्या स्वरुपात करार पध्दतीने उपलब्ध असलेल्या पदांचा विषय व तपशील खालीलप्रमाणे आहे.

| पदनाम | विषय | संख्या |
|---|---|---|
| प्राध्यापक | स्वस्थवृत्त | १ |
| प्राध्यापक | कौमारभृत्य | १ |
| सहयोगी प्राध्यापक | पंचकर्म | १ |

**मुलाखतीचा दिनांक :- ११.५.२०१६**

मुलाखतीस येणाऱ्या उमेदवाराने सर्व मूळ प्रमाणपत्रासह सकाळी ११ वाजता अधिष्ठाता रा.आ. पोदार वैद्यक महाविद्यालय, वरळी मुंबई येथे उपस्थित राहावे.

.....२

| | | |
|---|---|---|
| पदनाम | | प्राध्यापक |
| वयोमर्यादा | | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षांपर्यंत. |
| शैक्षणिक अर्हता | | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.अठ्ठावीस) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-अ-१, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी. संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी अर्हता धारण करीत नसल्यास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून शिक्षक मान्यता असणे गरजेचे आहे.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मूलभूत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, बोलण्यांस व वाचण्यांस समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | | सहयोगी प्राध्यापक हे पद धारण करणाऱ्या व त्या पदावर पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून.<br>किंवा<br>ज्याला संबंधित आयुर्वेदाच्या विषयामध्ये एकूण दहा वर्षांचा अध्यापनाचा अनुभव असेल, त्यापैकी मान्यताप्राप्त संस्थेतून संबंधित आयुर्वेदाच्या विषयाचे सहयोगी प्राध्यापक म्हणून पाच वर्षे अध्यापनाचा अनुभव असला पाहिजे. |
| मानधन | | प्रतिमाह रु.५०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). |

| | | |
|---|---|---|
| पदनाम | | सहयोगी प्राध्यापक |
| वयोमर्यादा | | कमाल वयोमर्यादा ६५ वर्षांपर्यंत. |
| शैक्षणिक अर्हता | | १) महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम, १९६१ (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. अठ्ठावीस) या अधिनियमाच्या परिशिष्टाच्या भाग-अ, भाग-ब किंवा भाग-क मध्ये नमूद केलेल्या अर्हतांपैकी एक अथवा भारतीय वैद्यक केंद्रिय परिषद अधिनियम, १९७० (१९७० चा ४८) या अधिनियमाखाली, भारतीय केंद्रिय वैद्यक परिषदेने वेळोवेळी निर्देशित केलेली समतुल्य अर्हता.<br>२) सांविधिक विद्यापीठाची अथवा मान्यताप्राप्त संस्थेची संबंधित आयुर्वेदिक विषयातील पदव्युत्तर पदवी. संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी अर्हता धारण करीत नसल्यास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाकडून शिक्षक मान्यता असणे गरजेचे आहे.<br>३) ज्या उमेदवारांचे आयुर्वेदाविषयीचे स्वतःचे मूलभूत संशोधनाचे निबंध किंवा पुस्तके प्रसिध्द झालेली असतील अशा उमेदवारांना प्राधान्य देण्यांत येईल.<br>४) मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत भाषेचे पुरेसे ज्ञान असावे. म्हणजेच त्यानुसार त्या भाषा सहजरीत्या लिहिण्यांस, बोलण्यांस व वाचण्यांस समर्थ असला पाहिजे. |
| अनुभव | | १) सहायक प्राध्यापक हे पद धारण करणाऱ्या व त्या पदावर पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या व्यक्तींमधून तसेच<br>२) म.आ. विज्ञान विद्यापीठ नाशिक यांच्या सहयोगी प्राध्यापक म्हणून त्या विषयात मान्यता असलेला असावा |
| मानधन | | प्रतिमाह रु.४०,०००/- (या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचे भत्ते व आर्थिक फायदे अनुज्ञेय असणार नाहीत). |

| | | | |
|---|---|---|---|
| इतर अटी | | १ | करार पध्दतीने करावयाच्या नियुक्तीचा कालावधी हा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून किंवा आस्थापना मंडळाकडून वा बदलीने तसेच अन्य प्रशासनिक कारणास्तव पात्र उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांच्या कालावधीकरिता, यापैकी जे अगोदर घडेल तो कालावधी राहील. |
| | | २ | नियुक्तीसाठी बाहयशक्तीचा दबाव अथवा शिफारस आणणारे उमेदवार नियुक्तीसाठी आपोआप अपात्र ठरतील. |
| | | ३ | सदर पदावर नियमित उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्या तारखेस कंत्राटी स्वरुपाची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. |
| | | ४ | मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या पदावर अर्ज करणाऱ्या उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे, अन्यथा अशा उमेदवाराचा अर्ज त्या प्रवर्गासाठी विचारात घेतला जाणार नाही. |
| | | ५ | उमेदवारास नियमित नियुक्त आणि कार्यरत असलेल्या अध्यापकांप्रमाणे पदाची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. |
| | | ६ | नियमित नियुक्त आणि कार्यरत अध्यापकांप्रमाणेच उमेदवारांचे कामाचे तास राहतील. |
| | | ७ | उमेदवारास सार्वजनिक सुट्टी आणि रविवार व्यतिरिक्त सेवा काळावधीनुसार नैमित्तीक रजा अनुज्ञेय राहतील. इतर कोणत्याही प्रकारच्या रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. |
| | | ८ | करार पध्दतीवरील नियुक्ती दिलेल्या उमेदवारास राजिनामा द्यावयाचा झाल्यास त्यांनी ३ महिन्यांची आगाऊ नोटीस अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई यांचेकडे देणे बंधनकारक राहील. ते शक्य नसल्यास ३ महिन्यांच्या मानधनाची रक्कम शासकीय कोषागारात जमा केल्यानंतर त्यांचा/तीचा राजिनामा अधिष्ठातांना मंजूर करता येईल. |
| | | ९ | करार पध्दतीवर नियुक्ती केलेल्या उमेदवारांच्या कामकाजाचा आढावा विभागप्रमुख व अधिष्ठाता हे नियमितपणे घेतील. असा आढावा असमाधानकारक असल्यास उमेदवारांच्या नियुक्त्या पुर्वसुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठातांकडे राहतील. |
| | | १० | करार पध्दतीच्या उमेदवारास विभागाचे प्रमुख व अधिष्ठाता यांच्या नियंत्रणाखाली आपल्या पदाच्या कर्तव्य व जबाबदाऱ्या पाडाव्या लागतील तसेच या उमेदवारांना नियमित अध्यापकांप्रमाणे पूर्णवेळ काम करणे बंधनकारक राहील. |
| | | ११ | करार पध्दतीवरील नियुक्त अध्यापकांना त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मुभा राहील. |
| | | १२ | करार पध्दतीवरील नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही तसेच करार पध्दतीवरील काम केलेला कालावधी सेवानिवृत्तीच्या लाभासाठी विचारात घेता येणार नाही. |
| | | १३ | नियुक्ती आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास नियुक्तीवरील दावा आपोआप संपूष्टात येईल. |
| | | १४ | प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदांसाठी अर्ज करणारे उमेदवार सद्यःस्थितीत कोणत्याही महाविद्यालयात कार्यरत असतील, अशा उमेदवारांना नियोक्त्यांकडून "ना हरकत प्रमाणपत्र" प्राप्त करुन घेऊन मुलाखतीच्या वेळेस सादर करणे आवश्यक राहील ("ना हरकत प्रमाणपत्राचा" नमुना पुढे दर्शविण्यांत आला |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | आहे). तसेच प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदावर रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), वरळी, मुंबई येथे नियुक्ती झाल्यास उमेदवाराला पूर्वीची नोकरी सोडावी लागेल. |

..........४

इच्छूक उमेदवारांनी www.mahayush.gov.in तसेच www.ayurvedinstitute.com या websites वर उपलब्ध करुन दिलेल्या विहित नमुन्यातच अर्ज भरुन, आवश्यक प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतींसह अधिष्ठाता, रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु.), डॉ.ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई - ४०० ०१८ येथे दिनांक ११.५.२०१६ रोजी थेट मुलाखतीसाठी (Walk-in-interview) सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे.

प्रथमतः उमेदवाराच्या प्रमाणपत्रांच्या तपासणी करण्यांत येईल. तपासणीअंती उमेदवार पात्र ठरल्यासच मुलाखत घेतली जाईल. अर्ज केलेला उमेदवार अपात्र ठरल्यास त्याची जबाबदारी त्या-त्या उमेदवाराची राहील. यास्तव फक्त पात्र उमेदवारांनीच उपस्थित राहण्यांची दक्षता घ्यावी. पात्र उमेदवाराने अटीं, शर्ती बाबत स्टॅम्पवर लिहून दयावे.

सही/-
अधिष्ठाता
रा.आ.पोदार वैद्यक महाविद्यालय (आयु)
वरळी, मुंबई